तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २ एप्रिल २०२५

आतील पानावर

पान २– ‘ग्राउंड झिरो’मध्ये इम्रान कमांडर
पान ३ – ‘ओडेला २’मध्ये तमन्ना
पान ४ – विजय देवरकोंडाने ‘किंगडम’साठी ...
पान ५ – सई पहिल्यांदाच थिरकणार लावणीवर!
पान ७– बहुप्रतीक्षित ‘वॉर २’ची प्रतिक्षा संपली

# ‘अल्लू अर्जुन’ ठरला देशातला सर्वात महागडा स्टार

साऊथ सुपरस्टार अल्लू अर्जुनने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे, परंतु ‘पुष्पा’ चित्रपटाने त्याला रातोरात स्टार बनवले. या चित्रपटामुळे अल्लू जगभरात प्रसिद्ध झाला आणि या चित्रपटासाठी त्याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला. त्याच वेळी, पुष्पा २ च्या ऐतिहासिक यशाने त्याला मोठ्या उंचीवर नेले. आता अल्लू अर्जुनने ‘पॅरलल युनिव्हर्स’ या मोठ्या बजेटच्या चित्रपटासाठी दिग्दर्शक अ‍ॅटलीसोबत हातमिळवणी केली आहे. या चित्रपटाची तयारी जोरात सुरू आहे. अ‍ॅटलीचा हा चित्रपट सन पिक्चर्सच्या बॅनरखाली तयार केला जात आहे. या अद्भुत चित्रपटाची सुरुवात एका खास घोषणेसह होणार आहे. अल्लू अर्जुन या चित्रपटासाठी मोठी रक्कम घेतली आहे आणि आज तो भारतातील सर्वात महागडा अभिनेता बनला आहे. या चित्रपटासाठी अल्लू अर्जुनने १७५ कोटी रुपयांचा करार केला आहे. यासोबतच तो चित्रपटाच्या नफ्यातील १५ टक्के वाटाही तो घेणार आहे. आजच्या काळात कोणत्याही अभिनेत्याने केलेला हा सर्वात मोठा करार आहे. अल्लू अर्जुनने ऑगस्ट २०२५ मध्ये ‘अ‍ॅटली’साठी त्याच्या तारखा बुक केल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, चित्रपटाचे चित्रीकरण ऑगस्ट ते ऑक्टोबर दरम्यान सुरू होईल. या चित्रपटात प्रेक्षकांना राजकारणापासून नाटकापर्यंत सर्व काही पाहायला मिळेल. या चित्रपटातून प्रेक्षकांना एक वेगळे जग पहायला मिळेल. हा संपूर्ण तक्रद ने भरलेला सिनेमा आहे. हा प्रकल्प अल्लू आणि अ‍ॅटली दोघांसाठीही खूप महत्त्वाकांक्षी आहे आणि तो भव्य करण्यासाठी कोणतीही कसर सोडली जाणार नाही. ‘पुष्पा २’ च्या ब्लॉकबस्टर यशानंतर, सर्वजण अल्लूच्या पुढील चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. या चित्रपटानंतर, अभिनेत्याला अनेक प्रोजेक्ट्स मिळाले, ज्यामध्ये त्याला केवळ दक्षिणेकडूनच नाही तर कन्नड ते मल्याळम चित्रपट उद्योगातूनही ऑफर येत आहेत.



# ‘ग्राउंड झिरो’मध्ये इम्रान कमांडर




**बॉ**लिवूडमध्ये एक वेगळी ओळख निर्माण केलेला प्रसिद्ध अभिनेता इमरान हाश्मी त्याच्या आगामी चित्रपटात बीएसएफ कमांडरच्या भूमिकेत दिसणार आहे. ‘ग्राउंड झिरो’ असे या चित्रपटाचे नाव आहे. एक्सेल एंटरटेनमेंटने ‘ग्राउंड झिरो’ चित्रपटाची घोषणा केल्यापासून या चित्रपटाकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे. या चित्रपटाची कथा देशासाठी बलिदान आणि देशाचे रक्षण करणार्यांवर आधारित असेल. एक्सेल एंटरटेनमेंटने आता या चित्रपटाचे पोस्टर रिलीज केले आहे. पोस्टरमध्ये इमरान हाश्मी दिसत आहे. एक्सेल एंटरटेनमेंटने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. हे पोस्टर ‘ग्राउंड झिरो’ चित्रपटाची आहे. यामध्ये इमरान हाश्मी पाठ आपल्याला दिसत आहे. इमरान हाश्मीने टी-शर्ट घातला आहे आणि त्याच्या हातात बंदूक आहे. पोस्टरमध्ये इमरान हाश्मी खूपच उत्साही दिसत आहे. पोस्टरच्या कॅप्शनमध्ये ‘द अनटोल्ड स्टोरी ऑफ ए मिशन ज्याने काश्मीरला कायमचे बदलले, असे लिहिले आहे. तर पुढे हा चित्रपट २५ एप्रिल रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे, अशी माहिती देखील देण्यात आली आहे. ‘ग्राउंड झिरो’च्या नवीन पोस्टरमध्ये लिहिले आहे, ‘सेनेने तुमचा मृत्यू इथे आणला, गाझी काश्मीरचा बदला घेईल.’ ‘ग्राउंड झिरो’ या चित्रपटात इमरान हाश्मी बीएसएफचे डेप्युटी कमांडंट नरेंद्र नाथ दुबे यांची भूमिका साकारणार आहे. चित्रपटाच्या कथेनुसार तो राष्ट्रीय सुरक्षेला असलेल्या धोक्याची दोन वर्षे चौकशी करणार आहे. तसेच या सिनेमात ॲक्शन पाहायला मिळणार आहे. इमरान हाश्मीशिवाय या चित्रपटात सई ताम्हणकर आणि मुकेश तिवारी यांच्याही प्रमुख भूमिका आहेत.




# ‘छोरी २’चा धडाकेबाज टीझर रिलीज

**अ**भिनेत्री नुसरत भरुचाचा ‘छोरी’ हा एक हॉरर चित्रपट २०२१ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीस आला होता. या चित्रपटाला मिळालेल्या मोठ्या यशानंतर ‘छोरी’ च्या दुसर्या भागाची देखील घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर चाहत्यांकडून आनंद व्यक्त करण्यात आला होता. यातच आता निर्मात्यांनी ‘छोरी २’ च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करत टीझर देखील रिलीज केला आहे. प्राईम व्हिडीओ या ओटीटी प्लॅटफॉर्मने सोशल मीडियावर ‘छोरी २’चा टीझर शेअर केला आहे. या टीझरला देखील खतरनाक कॅप्शन देण्यात आले आहे. कॅप्शनमध्ये लिहिले की, एक बार फिरवो खेत, वो खतरा, वो खौफ या कॅप्शनने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. एक छोटी मुलगी हातात कंदिलाचा दिवा घेऊन विहिरीजवळ जाते. अचानक तिचा पाय ओढून तिला खेचण्यात येते. पुढे पडक्या घरात नुसरत भरुचाची एन्ट्री होते. त्यानंतर चेहर्यावर दुपट्टा घेऊन भूताच्या रुपात सोहा अली खान दिसते. टीझरमधील तिचा लूक खूप भयानक आहे. ‘छोरी २’मध्ये नुसरत भरुचासह अनेक नवीन कलाकार दिसणार आहेत.

# आमिर खान आणि सुर्या ‘गजनी २’मध्ये एकत्र दिसणार

**बॉ**लीवूड अभिनेता आमिर खानचा ‘गजनी’ हा चित्रपट सुपरहिट ठरला. २००८ साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने जवळपास १०० कोटींची कमाई केली होती. आता लवकरच या सिनेमाचा सीक्वल बनणार आहे. विशेष म्हणजे ‘गजनी २’ मध्ये साऊथचा मोठा सुपरस्टार आमिरसोबत काम करणार आहे. या चित्रपटाचे हिंदी व्हर्जन आणि तमिळ व्हर्जन दोन्ही एकाच वेळी शूट केले जाणार आहेत. आमिर खानसोबत साऊथ सुपरस्टार अभिनेता सुर्या दिसण्याची चर्चा आहे. ‘गजनी’ हा मूळ सिनेमा साऊथमध्ये पहिल्यांदा बनवला गेला. या सिनेमात सुर्याने प्रमुख भूमिका साकारली होती. दरम्यान, आता अशा बातम्या येत आहेत की एआर मुरुगदास आमिर खानसोबत गजनी २ वर काम करायला सुरुवात करणार आहेत. स्वतः त्यांनी याबद्दल खुलासा केला आहे. एआर मुरुगदास यांनी २००८ मध्ये आमिर खानचा ‘गजनी’ चित्रपट दिग्दर्शित केला होता हे फार कमी लोकांना माहिती असेल. १०० कोटी रुपये कमावणारा हा पहिला बॉलिवूड चित्रपट ठरला. १७ वर्षांपूर्वी आलेला ‘गजनी’ हा एक ब्लॉकबस्टर चित्रपट होता. या चित्रपटात अभिनेता आमिर खानसोबत अभिनेत्री असिन मुख्य भूमीकेत झळकली होती. ए.आर. मुरुगदास यांनी गजनी २ बद्दल चर्चा केली. निर्माते अल्लू अरविंद यांनी चित्रपट पुढे नेण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर या बातम्यांना आणखी वेग आला आहे. २००५ मध्ये सूर्या अभिनीत तमिळ चित्रपट ‘गजनी’ २००८ मध्ये आमिर खानसोबत हिंदीमध्ये रिमेक करण्यात आला, जो बॉक्स ऑफिसवर १०० कोटींचा आकडा ओलांडणारा पहिला बॉलिवूड चित्रपट ठरला. तो एक ऐतिहासिक चित्रपट ठरला. अलिकडच्या अहवालांमधून असे दिसून आले आहे की ‘गजनी २’ हा एक द्विभाषिक प्रोजेक्ट असेल, जो एकाच वेळी तमिळ आणि हिंदीमध्ये चित्रित केला जाईल, ज्यामध्ये सूर्या आणि आमिर खान आपापल्या भूमिका पुन्हा साकारतील.



# योगी आदित्यनाथांवर येणार बायोपिक

योगी आदित्यनाथ हे भारतीय राजकारणातील महत्वाचं नाव. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री असलेल्या योगी आदित्यनाथ यांच्यावर बायोपिक येणार अशी चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरु होती.

या बायोपिकमध्ये योगी आदित्यनाथ यांच्या भूमिकेत कोण झळकणार हे सुद्धा अद्याप गुलदस्त्यात होतं. अखेर याविषयी खुलासा झाला आहे. कारण योगी आदित्यनाथ यांच्या आयुष्यावर आधारीत बायोपिकचा टीझर रिलीज झालाय. योगी आदित्यनाथ यांच्या आयुष्यावरील बायोपिकचं नाव आहे 'अजेय'. '१२th फेल' फेम अभिनेता अनंत जोशी या सिनेमात योगी आदित्यनाथ यांच्या भूमिकेत झळकणार आहे. अनंत जोशीचा जबरदस्त लूक टीझरमध्ये पाहायला मिळतोय. याशिवाय 'अजेय' सिनेमात परेश रावल आणि भोजपुरीतील प्रसिद्ध अभिनेता निरहूआ बघायला मिळतोय. योगी आदित्यनाथ यांचा जीवनप्रवास 'अजेय' सिनेमातून उलगडणार आहे. हा सिनेमा शांतनु गुप्ता यांचं बेस्टसेलर पुस्तक 'द मॉन्क हू बिकेम चीफ मिनिस्टर' यावर आधारीत आहे. रविंद्र गौतम यांनी या सिनेमाचं दिग्दर्शन केलं आहे.

अनंत जोशी, परेश रावल, निरहूआ यांच्यासोबत सिनेमात अजय मेंगी, पवन मल्होत्रा, राजेश खट्टर, गरिमा सिंह हे कलाकारही झळकणार आहेत. सिनेमाची रिलीज डेट अजून समोर आली नसली तरीही २०२५ लाच हा सिनेमा रिलीज होणार आहे.




# श्वेता त्रिपाठी करणार चित्रपट निर्मिती

मिर्झापूर फेम अभिनेत्री श्वेता त्रिपाठी अभिनयानंतर आता निर्माती म्हणून पदार्पण करणार आहे. श्वेताच्या प्रॉडक्शन हाउसकडून दोन महिलांमधील प्रेमहाणीवर आधारित चित्रपट सादर केला जाणार आहे. श्वेताच्या प्रॉडक्शन हाउसकडून निर्माण होणारा चित्रपट एलजीबीटीक्यूआयए प्लसवर आधारित आहे. जेव्हा एक कलाकार म्हणून ही पटकथा माझ्याकडे आली तेव्हा मी त्वरित याची संवेदनशीलता आणि त्यातील प्रेमाची मांडणी पाहून आकर्षित झाले. ही कहाणी योग्यप्रकारे मांडणे महत्वपूर्ण असल्याची जाणीव मला झाली. यानंतरच मी निर्माती म्हणून यात सहभागी होण्याचा निर्णय घेतल्याचे श्वेता त्रिपाठीने सांगितले आहे. हा केवळ एक चित्रपट नसून प्रेम, ओळख आणि स्वत:च्य असण्याचा साहसाचा उत्सव आहे. एक निर्माती म्हणून आता माझ्याकडे कहाण्याची रचनात्मक स्वातंत्र्य आहे आणि मी याहून चांगल्या सुरुवातीची अपेक्षा करू शकत नव्हते असे श्वेताने सांगितले आहे. याचबरोबर श्वेताच्या प्रॉडक्शन हाउसकडून एक भयपट, एक ड्रामा आणि सायकोलॉजिकल थ्रिलरपट निर्माण केला जाणार आहे. आम्ही जे चित्रपट पाहत लहानाचे मोठे होतो, ते आम्हाला घडविण्यास भूमिका बजावत असतात. मुलांच्या मनावर एक स्थायी प्रभाव पाडणाऱ्या कहाण्यांची निवड करणार असल्याचे श्वेताने म्हटले आहे.



# 'ओडेला २'मध्ये तमन्ना

अभिनेत्री तमन्ना भाटिया चित्रपटसृष्टीत स्वत:च्या सौंदर्य अन् उत्तम नृत्यासाठी ओळखली जाते. तमन्नाचा बहुप्रतीक्षित चित्रपट ओडेला २ लवकरच प्रदर्शित होणार आहे. जेव्हा अंधकार पसरतो आणि आशा धूळीस मिळतात तेव्हा शिवशक्ति जागृत होते अशी कॅप्शन देत निर्मात्यांनी या चित्रपटाचे पोस्टर जारी केले आहे. या पोस्टरनुसार हा चित्रपट १७ एप्रिल रोजी प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट ओडेला फ्रँचाइजीचा दुसरा भाग आहे. तर पहिल्या चित्रपटाचे नाव ओडेला रेल्वेस्टेशन होते. या चित्रपटाचे दिग्दर्शन राजीव नायर यांच्याकडून करण्यात आले आहे. या चित्रपटात तमन्ना ही एका साध्वीची भूमिका साकारत आहे. यात ती वेगळा लुक अन् व्यक्तिरेखेत दिसून येत आहे. तमन्नाचा अलिकडेच विजय वर्मासोबत ब्रेकअप झाला आहे. यामुळे ती सध्या चर्चेत आहे. तमन्ना अन् विजय यांनी परस्परांचे मार्ग वेगवेगळे केले आहेत. तमन्ना या ब्रेकअपच्या दु:खातून बाहेर पडत पुन्हा स्वत:ला कामात बुडवून घेत आहे.



# राम चरणचा 'आरसी १६' चित्रपट प्रदर्शनाच्या तयारीत



साऊथचा सुपरस्टार राम चरण सध्या त्याच्या आगामी 'आरसी १६' चित्रपटामुळे चर्चेत आहे. तो बुची बाबू सना दिग्दर्शित या चित्रपटाच्या निर्मितीत व्यस्त आहे. चित्रपटाचे चित्रीकरण वेगाने सुरू आहे. वेळोवेळी चित्रपटाशी संबंधित नवीन माहितीही समोर येत आहे. आता, चित्रपटाशी संबंधित एक नवीन अपडेट समोर आले आहे, जी त्याच्या रिलीज डेटशी संबंधित आहे. हैदराबादमध्ये चित्रपटाचे चित्रीकरण वेगाने सुरू आहे.


दरम्यान, आता त्याच्या रिलीज डेटबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. रिपोर्ट्सनुसार, हा बहुप्रतिक्षित चित्रपट २६ मार्च २०२६ रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होईल. ही तारीख खास आहे कारण ती राम चरणच्या वाढदिवसाच्या एक दिवस आधीची आहे. जर राम चरणच्या वाढदिवसापूर्वी चाहत्यांना अभिनेत्याच्या नवीन चित्रपटाची भेट मिळाली तर ते खूप उत्सुक असतील. तथापि, या बातम्यांना अधिकृत पुष्टी मिळण्याची प्रतीक्षा आहे. त्याच वेळी, चित्रपटाचे सध्याचे शूटिंग वेळापत्रक काही दिवस हैदराबादमध्ये सुरू राहील. हे एक अतिशय महत्त्वाचे वेळापत्रक आहे ज्यामध्ये राम चरण आणि जान्हवी कपूर यांच्या प्रमुख दृश्यांचे चित्रीकरण सध्या सुरू आहे.

या चित्रपटाचे चित्रीकरण दक्षिणेतील अभिनेता शिवा राजकुमारनेही सुरू केले आहे. त्याचा लूक टेस्टही नुकताच घेण्यात आला. अलिकडेच क्रिकेटशी संबंधित काही महत्त्वाचे दृश्ये खास बांधलेल्या स्टेडियमच्या सेटमध्ये चित्रित करण्यात आली.

या चित्रपटात राम चरण पूर्णपणे नवीन लूकमध्ये दिसणार आहे, ज्याचे संगीत ए.आर. रहमान यांनी दिले आहे. या चित्रपटाची निर्मिती पुष्पाच्या मैत्री मूव्ही मेकर्स या बॅनरद्वारे केली जात आहे. या चित्रपटात जान्हवी कपूर मुख्य भूमिकेत आहे, राम चरणसोबत तिचा हा पहिलाच चित्रपट आहे.

# प्रभास साकारणार बकासुराची भूमिका?

'बाहुबली' सिनेमातून संपूर्ण भारतीयांच्या मनावर राज्य केलेला अभिनेता म्हणजे प्रभास. 'आदिपुरुष' सिनेमात प्रभासने प्रभू श्रीरामांची भूमिकाही साकारली. या ऐतिहासिक आणि पौराणिक सिनेमानंतर प्रभास आता महाभारतावर आधारीत एका सिनेमात थेट राक्षस असलेल्या बकासुराची भूमिका साकारताना दिसणार आहे. याविषयीची एक मोठी माहिती आज समोर येतेय. काही महिन्यांपूर्वी सुपरहिट ठरलेल्या 'हनुमान' सिनेमाचे दिग्दर्शक प्रशांत वर्मा आगामी सिनेमाच्या तयारीसाठी सज्ज आहे. या सिनेमाचं नाव आहे 'बका'. महाभारतातील राक्षस बकासुरावर हा सिनेमा आधारीत असल्याचं बोललं जात होतं. ग्रामीण भागात हा बकासुर सामान्य माणसांचा बळी द्यायचा. लोकांच्या जवळचा जेवणाचा साठा संपेल इतकी त्याला भूक लागायची. सामान्य माणसांचा छळ करुन बकासुराने सर्वांच्या नाकीनऊ आणले होते. याच बकासुराचा पुढे भीमाने वध केला. प्रभास याच बकासुराच्या भूमिकेत दिसणार असल्याची चर्चा असल्याने चाहत्यांमध्ये आतापासूनच उत्सुकता निर्माण झाली आहे. प्रभासच्या आगामी वर्कफ्रंटबद्दल सांगायचं तर, तो सध्या 'स्पिरीट', 'सालार २', 'राजा साब' अशा आगामी सिनेमांच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. याशिवाय २०२४ मध्ये प्रभासच्या रिलीज झालेल्या 'कल्की' सिनेमाचा सीक्वल अर्थात 'कल्की २' मध्येही प्रभास झळकणार आहे. त्यामुळे प्रभासच्या आगामी सिनेमांची उत्सुकता आहे. चित्रपटात निर्मात्याच्या भूमिकेत असणार आहे.



# विजय देवरकोंडाने 'किंगडम'साठी पुन्हा केले काम



विजय देवरकोंडा स्टारर ॲक्शन थ्रिलर चित्रपट 'किंगडम' रिलीजसाठी सज्ज झाला आहे. निर्मात्यांनी नुकताच चित्रपटाचा पहिला टीझर रिलीज केला, त्यानंतर चाहत्यांमध्ये चित्रपटाबद्दलची उत्सुकता आणखी वाढली. आता हा चित्रपट आणखी एका कारणामुळे चर्चेत आहे. अलीकडेच, नागा वामसी या चित्रपटाचे निर्माते विजयच्या फीशी संबंधित मनोरंजक माहिती शेअर केली आहे.

अलिकडच्या एका मुलाखतीत, किंगडमचे निर्माते नागा वामसी यांनी खुलासा केला की विजय देवरकोंडाने किंगडमसाठी फक्त एक नाममात्र रक्कम घेतली आहे आणि चित्रपटाचे बजेट परत मिळाल्यावर आणि चित्रपटगृहात प्रदर्शित झाल्यावर तो नफा मिळवल्यानंतर तो त्यातील काही भाग घेईल. निर्मात्याने सांगितले, 'अशा प्रकारे आपण चित्रपट मोठ्या प्रमाणात बनवण्यासाठी अधिक पैसे गुंतवू शकतो.' 'लायगर'च्या निर्मितीदरम्यान विजयनेही असेच केले होते, हे आम्ही तुम्हाला सांगतो. जेव्हा लायगरचे दिग्दर्शक-निर्माते पुरी जगन्नाथ एका महत्त्वाच्या वेळापत्रकापूर्वी बजेट वाढवण्यासाठी संघर्ष करत होते तेव्हा विजयने त्याच्या मानधनाचा मोठा भाग परत केला होता. यापूर्वी, नागा वामसी यांनी सांगितले होते की हा चित्रपट दोन भागात येण्याची शक्यता आहे. आम्ही कथा फक्त दोन भागांची फ्रँचायझी बनवण्यासाठी वाढवली नाही. या चित्रपटाला दोन भागात प्रदर्शित करण्याची व्याप्ती आहे. प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक अनिरुद्ध रविचंदर यांनी संगीत दिले.

# संत मुक्ताईच्या भूमिकेसाठी नेहाने घेतले प्रशिक्षण


मराठीमधील भूमिकांच्या जवळ जाताना या कलाकारांना खूप मेहनत घ्यावी लागते. त्यातही ती भूमिका आव्हानात्मक असेल तर जबाबदारी अधिक वाढते. दिग्पाल लांजेकर लिखित-दिग्दर्शित 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटातून अभिनेत्री नेहा नाईक हा युवा चेहरा भेटीला येणार आहे. या चित्रपटातील संत मुक्ताईची भूमिका ती साकारणार आहे. 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा भव्य मराठी चित्रपट १८ एप्रिलला आपल्या भेटीला येतोय. रेश्मा कुंदन थडानी यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. नेहा नाईक ही अभिनेत्री पुण्यामध्ये रंगभूमीवर अतिशय उत्तमरीत्या कार्यरत आहे. आता 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या एका वेगळ्या विषयावर तितक्याच ताकदीची भूमिका साकारताना नेहाने आपल्या देहबोली सोबत वाणी संस्काराचे खास प्रशिक्षण पुण्यातील ज्येष्ठ नाट्यगुरू प्रा. श्यामराव जोशी यांच्याकडे तब्बल तीन महिने घेतले. मुक्ताई यांनी आपल्या अल्पकालीन आयुष्यात जे अनुभवले आणि त्यायोगे जे भोगले त्या सर्वांचे प्रतिबिंब त्यांच्या अभंगातून आणि काव्यातून उमटले आहे. या चित्रपटाची भाषा ही १३ व्या शतकातील मराठी भाषेचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे उच्चारांमध्ये सहजता यावी यासाठी अनेक अवघड आणि कष्टप्रद अभ्यासाचे प्रकार नेहाला अभ्यासावे लागले. संत मुक्ताईंचे आणि त्यांच्या कुटुंबाचे प्रेरणादायी चरित्र



'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' चित्रपटातून उलगडणार आहे. त्यामुळे भाषेचा हा अभ्यास अत्यंत अनिवार्य होता. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना नेहा सांगते, या चित्रपटात काम करायचं म्हणजे आधी या चित्रपटाच्या संहितेवर प्रभुत्व मिळवायला हवं. म्हणून मी त्यातल्या भाषेच्या अभ्यासावर भर दिला. यातील संवादांच्या अनेक दिवस तालमी चालू होत्या. भाषेबरोबरच ते शब्द उच्चारताना स्वाभाविकपणे होणारी देहबोली कशी असेल याचे दिग्पाल दादाने धडे दिले. त्याकरता माझ्या गावी जाऊन तिथल्या महिलांच्या देहबोलीचे निरीक्षण मी केले. वयाच्या आणि कारकिर्दीच्या सुरुवातीलाच इतकी कस लावणारी तरीही सुंदर प्रक्रिया मला अनुभवायला मिळाली हा मी मुक्ताईचा आशीर्वादच समजते. चित्रपटात मृणाल कुलकर्णीसारख्या अनुभवी कलाकारांना काम करताना पाहताना माझे एक वेगळेच प्रशिक्षण झाले.

अभिनय या बाबतीत या सिनेमाने मला नवा दृष्टिकोन दिला. म्हणून 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा चित्रपट माझ्यासाठी कायम हृदयाच्या जवळ असणार आहे. कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह किंवा प्रतिमा या भावंडांच्या भूमिका करणाऱ्या कलाकारांसोबत येऊ नयेत. यासाठी ऑडिशन घेऊन सुमारे दिडशे तरुणींमधून नेहाची निवड केल्याचं दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी सांगितलं आहे. ते म्हणाले, नेहा जरी नवखी असली तरी तिने खूप मेहनत घेऊन आपली व्यक्तिरेखा चित्रपटात आत्मविश्वासाने साकारली आहे. 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटामध्ये नेहाने साकारलेल्या 'संत मुक्ताई' द्वारे आजच्या पिढीला भाऊ-बहिणीच्या नात्याची नव्याने ओळख व्हायला मदत होईल अशी मला खात्री आहे.

# समर्थ रामदास चित्रपटाचा टिझर लाँच



मराठी सिनेसृष्टीत ऐतिहासिक आणि आध्यात्मिक चित्रपटांचं वेगळंच स्थान आहे आणि आता या यादीत आणखी एक जबरदस्त चित्रपटाची भर पडतेय ती म्हणजे 'राष्ट्रगुरु समर्थ रामदास'! नुकताच या चित्रपटाचा टिझर प्रदर्शित झाला असून, त्याला चांगला प्रतिसाद मिळतोय. हा केवळ ऐतिहासिक चित्रपट नसून, समर्थ रामदास स्वामींच्या विचारांचा आधुनिक काळात जागर करणारा आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन सुप्रसिद्ध व्हिएफक्स डिझायनर अनिकेत साने यांनी केलंय तर कल्पना फिल्म्स अँड व्हिएफएक्स स्टुडिओने सिनेमाची निर्मिती केली आहे. 'जंगलबुक' या हॉलिवूडपटासारखा मराठीतही एक सिनेमा व्हावा असा अनिकेत यांनी यावेळी प्रयत्न केला आहे. तब्बल १० वर्षांच्या मेहनतीनंतर हा प्रोजेक्ट उभा राहिलाय.

रामदास स्वामींच्या चरित्रावर भरपूर संशोधन करून आणि 'दासबोध' चा सखोल अभ्यास करून या चित्रपटाची कथा तयार करण्यात आली. साने यांनी या प्रोजेक्टसाठी मराठी सिनेसृष्टीतील अनेक लोकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण अपेक्षित सहकार्य मिळालं नाही. त्यामुळे त्यांनी स्वतःच पुढाकार घेत, हा चित्रपट पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. अनिकेत साने यांनी 'सनी', 'झिम्मा २', 'नवरा माझा नवसाचा २' यांसारख्या सुपरहिट मराठी सिनेमांसाठी व्हिएफक्स केलंय. या अनुभवाचा पुरेपूर वापर करून, त्यांनी 'राष्ट्रगुरु समर्थ रामदास' मध्ये जबरदस्त व्हिएफक्स आणि ऐतिहासिक दृश्यं निर्माण केली आहेत. चित्रपटाच्या टिझरमध्ये सज्जनगड, काळाराम मंदिर,जांब समर्थ आणि इतर ऐतिहासिक स्थळं व्हिएफक्सद्वारे अगदी हुबेहुब साकारण्यात आली आहेत.

हा चित्रपट केवळ इतिहास सांगणारा नाही, तर समाजाला दिशा देणारा आहे! समर्थ रामदास स्वामींची शिकवण आणि श्रवण भक्तीचे फायदे, त्यांचा कर्मयोग आणि भक्तीची संकल्पना हे सगळं प्रभावीपणे दाखवण्यात आलंय. सिनेमाबद्दल बोलताना अनिकेत साने म्हणतात की, 'राष्ट्रगुरु समर्थ रामदास' हा केवळ एक चित्रपट नाही, तर समर्थ रामदास स्वामींच्या विचारांचा आधुनिक जागर आहे. त्यांनी समाजासाठी दिलेलं योगदान आणि त्यांची शिकवण आजच्या तरुणाईपर्यंत पोहोचवणं हा माझा मुख्य उद्देश आहे.

# सई पहिल्यांदाच थिरकणार लावणीवर!

२०२५ वर्ष सुरू झाल्यापासून अनेक नव्या मराठी सिनेमांची घोषणा झाली आहे. तर काही सिनेमांच्या प्रदर्शनाच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. यात दिवसागणिक वाढ होत असून आता 'देवमाणूस' या नव्या मराठी सिनेमाची घोषणा झाली आहे. हा मल्टीस्टारर सिनेमा असून यात महेश मांजरेकर, सुबोध भावे, रेणुका शहाणे आणि सिद्धार्थ बोडके हे कलाकार झळकणार आहेत. 'देवमाणूस' चित्रपटाचं दिग्दर्शन तेजस देऊस्कर यांनी केलं आहे. या चित्रपटाची निर्मिती बॉलीवूडमधील प्रसिद्ध दिग्दर्शक लव रंजन यांच्या निर्मितीसंस्थेने केली आहे. लव रंजन आणि अंकुर गर्ग यांची लव फिल्म्स कंपनी अनेक लोकप्रिय बॉलीवूड चित्रपटांसाठी ओळखली जाते, त्यांनी 'तू झूठी मैं मक्कार', 'सोनू के टीटू की स्वीटी', 'दे दे प्यार दे' यांसारख्या चित्रपटांची निर्मिती केली आहे.



आता ही कंपनी मराठी सिनेमात प्रवेश करत आहे. 'देवमाणूस' हा त्यांची निर्मिती असलेला पहिला मराठी सिनेमा असून, तो २५ एप्रिल २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. सर्वांची लाडकी अभिनेत्री सई ताम्हणकर 'देवमाणूस'मध्ये पहिल्यांदाच लावणी सादर करणार आहे. हे गाणं एप्रिलमध्ये चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पहिल्यांदाच सई मोठ्या पडद्यावर लोककला सादर करणार आहे. याबद्दल सई सांगते, लव फिल्म्ससोबत काम करण्याची आणि 'देवमाणूस' परिवाराचा भाग होण्याची संधी मिळाल्याने मी प्रचंड आनंदी आहे.

पहिल्यांदाच मी माझ्या कम्फर्ट झोनच्या बाहेर जाऊन लावणी सादर करत आहे आणि माझ्या चाहत्यांनी व प्रेक्षकांनी ती पाहावी, यासाठी मी खूप उत्सुक आहे. आताच फार काही सांगू शकत नाही, मात्र मी जे काही सादर करणार आहे, ते प्रेक्षकांसाठी एक नवीन आणि वेगळा अनुभव ठरेल, याची मला खात्री आहे!

# ....खामोश! चपडगंजू...!!

# बोलघेवडा शत्रुघ्न सिन्हा; एक धडधडती शॉटगन

'वारंवार सांगितलेले असत्य कालांतराने सत्य म्हणून स्थापित होते' या उक्तीस सार्थ ठरवणारे काही अफाटराव हिंदी चित्रपटसृष्टीने प्रत्यही अनुभवले आहेत. हिंदी चित्रपटसृष्टी हा मुद्दलातच चमकोगिरी व दाखवेगिरीचा व्यवसाय आहे. 'जे दिसते, तेच विकते' व 'जो बोलतो, तोच चालतो' हा या चित्रपटसृष्टीचा स्थायीभाव. स्वत:च्या मस्तीत व शैलीत व्यावसायिक आयुष्य व्यतीत करणारे, तरीदेखील यशस्वी असलेल्या अभिनेत्यांमध्ये 'बिहार का बिटवा' शत्रुघ्न सिन्हा यांचाही समावेश होतो. राकट व रांगडे व्यक्तिमत्त्व, चेहर्‍यावर जखमेचा ठसठशीत व्रण व दबकेदार देहबोली आणि सोबतच दुसर्‍याला तुच्छ लेखणारी खास संवादफेक या आयुधांनिशी सज्ज शत्रुघ्नप्रसाद सिन्हा यांचा जन्म १५ जुलै १९४६ रोजी बिहारच्या राजधानीत, पाटणा येथे संपूर्ण रामायण समर्पित कुटुंबात झाला. राम, लक्ष्मण व भरत हे त्यांचे थोरले भाऊ..!

लहानपणापासूनच अखखड मिजाज व आक्रमक असलेल्या शत्रुघ्न सिन्हा यांनी पाटण्याच्या सुविख्यात पाटणा विज्ञान महाविद्यालयातून कशीबशी स्नातक उपाधी प्राप्त केली. त्यांचे शिक्षणात फारसे लक्ष नव्हतेच, पण रामलीला व नौटंकी या कलाप्रकाराचे त्यांना अतीव आकर्षण होते. पण, त्यांच्यावर सर्वात जास्त प्रभाव होता तो हिंदी चित्रपटांचा. 'श्री ४२०' व 'मुगल-ए-आझम' हे चित्रपट त्यांच्या विशेष आवडीचे होते. अष्टपैलू राज कपूर यांचे ते चाहते होते. बघितलेल्या चित्रपटाची कथा साभिनय सादर करण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. अतिशय उत्तम नकलाकार असलेल्या शत्रुघ्न सिन्हा यांनी आपले पदवी शिक्षण संपल्यानंतर आपसूकच चित्रपट अभिनय हे क्षेत्र आयुष्यभरासाठी निवडण्याचा निर्धार केला. आईच्या सक्रिय सहयोग व प्रोत्साहनाने त्यांनी पुणे येथील 'चित्रपट व दूरचित्रवाणी संस्थे'त अभिनय प्रशिक्षण अभ्यासक्रमात प्रवेश मिळविला. हा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर प्रथेप्रमाणे त्यांची पावले मुंबईकडे वळली.

१९६८ साली हिंदी चित्रपटसृष्टीत मन्वंतर येऊ लागले होते. राजेश खन्नाच्या झंझावाताची सुरुवात होण्याअगोदरच्या संक्रमण काळात शत्रुघ्न सिन्हा यांना रुपेरी पदार्पणाची संधी मिळाली, ती देव आनंद यांच्या दिग्दर्शकीय पदार्पणाचा चित्रपट 'प्रेम पुजारी (१९६९)' मध्ये. अर्थात, त्यांचा पहिला प्रदर्शित चित्रपट होता 'साजन.' कारण 'प्रेम पुजारी' निर्मिती अवस्थेत रखडला. बहुसंख्य कलावंतांप्रमाणे त्यांची रुपेरी कारकीर्द कोणताही गाजावाजा न करता प्रारंभ झाली. शत्रुघ्न सिन्हा यांचे एकंदरीत व्यक्तिमत्त्व हे दबंग असल्यामुळे खलनायकी व नकारात्मक छटेच्या भूमिका आपसूक त्यांच्या वाट्याला आल्या. गुलजार यांचे दिग्दर्शक म्हणून पदार्पण असलेल्या 'मेरे अपने' या चित्रपटात गळ्यावर हात फिरवत केलेली दमबाजी हे या चित्रपटातील शत्रुघ्न सिन्हाच्या भूमिकेचे खास वैशिष्ट्य. 'बनफूल', 'शरारत' या चित्रपटांतील त्यांच्या भूमिका गाजल्या. पण, त्यांना खरा हात दिला तो त्याचवर्षी (१९७२) आलेल्या 'भाई हो तो ऐसा', 'बॉम्बे टू गोवा' चित्रपटातील लक्षवेधी भूमिकांनी. 'मिलाप' या पुनर्जन्मावर आधारित चित्रपटात त्यांची दुहेरी भूमिका होती. १९७३ वर्षी त्यांचे 'शरीफ बदमाश', 'समझौता', 'कश्मकश', 'एक नारी दो रूप' हे चित्रपटप्रदर्शित झाले. 'ब्लॅकमेल', 'आ गले लग जा', 'झील के उस पार', 'गाय और गौरी' व 'सबक' या चित्रपटांनी यश मिळवले व शत्रुघ्न सिन्हा स्थिरावले.

१९७४ साली आलेल्या 'बदला' चित्रपटातील त्यांच्या खास शैलीतील 'खामोश', 'चपडगंजू' या विशेषणांनी धूम केली व हे शब्दप्रयोग त्यांच्याशी कायमचे निगडित झाले. याच सुमारास त्यांना नायक बनण्याचे वेध लागले. १९७६ साली आलेल्या 'कालीचरण' चित्रपटाने अमाप यश मिळवले व शत्रुघ्न सिन्हा ही नाममुद्रा लखलखली. १९७७ साली त्यांची भूमिका असलेला 'आदमी सडक का' व त्यातील 'आज मेरे यार की शादी है' हे गीत तूफान गाजले. 'कोतवाल साब' चित्रपटातील पोलिस अधिकार्‍याच्या भूमिकेत त्यांचा अभिनय लक्षवेधी होता. १९७८ साली आलेल्या 'विश्वनाथ' चित्रपटाने त्यांना अमाप लोकप्रियता मिळवून दिली. यातील त्यांची वकिलाची भूमिका व 'जली को आग कहते है, बुझी को राख कहते है, जिस राख से बारूद बने, उसे विश्वनाथ कहते है..' हा संवाद कालजयी ठरला. अर्थात, या कालखंडात अमिताभ बच्चन यांचा रुद्रप्रपात सकल चित्रपटविश्वाला व्यापून होता. त्यामुळे शत्रुघ्न सिन्हा व इतर नायकांनाही मार्गक्रमणा कठीण झाली होती. १९७९ साली आलेल्या बहु-सितारी 'जानी दुश्मन' व 'काला पत्थर' या चित्रपटातील भूमिका प्रेक्षकप्रिय ठरली.



१९८० च्या दशकात 'क्रांती', 'नसीब', 'दो उस्ताद', 'दिल-ए-नादान', 'हथकडी', 'मंगल पांडे' या चित्रपटांत त्यांनी आपली छाप उमटवली. या दशकातील त्यांचे 'नरम गरम' व 'कयामत' (१९८३) हे चित्रपट विशेष उल्लेखनीय. 'माटी मांगे खून' हा त्यांचा महत्त्वाकांक्षी चित्रपट साफ कोसळला तर 'भवानी जंक्शन', 'काली बस्ती', 'काला सूरज', 'कालका' या चित्रपटातील कथावस्तू व अभिनय चांगला असूनही सर्वसामान्य जनतेने त्यांच्याकडे पाठ फिरवली. 'कत्ल', 'समय की धारा', 'इल्जाम' हे १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धातील त्यांचे उल्लेखनीय चित्रपट. पण त्यांचे खरे पुनरुत्थान झाले ते 'खुदगर्ज' (१९८७) चित्रपटाने. या चित्रपटातील बिहारी बाजाची भूमिका त्यांनी झोकात वठवली.

१९९० च्या दशकात त्यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला व नवी दिल्ली लोकसभा मतदारसंघातून राजेश खन्ना यांच्या विरोधात पोटनिवडणूक लढवली, पण त्यात त्यांचा पराभव झाला. १९९४ ते २००८ या दीर्घ कालावधीत ते राज्यसभा सदस्य होते. केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान प्राप्त करणारे ते पहिले हिंदी अभिनेते होते. २००९ व २०१४ साली ते पाटणा साहिब मतदारसंघाचे खासदार होते. २०१९ ला त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला व २०२२ साली तृणमूल काँग्रेसच्या तिकिटावर आसनसोल लोकसभा मतदारसंघातून पोटनिवडणूक जिंकली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही ते याच मतदारसंघातून विजयी झाले. त्यांच्या पत्नी पूनम चंदीरामानी या 'मिस इंडिया' किताबाच्या मानकरी होत्या तर पुत्र लव-कुश चित्रपट क्षेत्रात विद्यमान आहेत. आपल्या बेताल वक्तव्यांनी ते बरेचदा अडचणीत आले. लेट लतिफी व बेशिस्त या दुर्गुणांमुळे त्यांना बर्‍याच चित्रपटांमधून डच्चू मिळाला व खूप सार्‍या चित्रपट निर्माते व अभिनेत्यांशी त्यांची खडाजंगी झाली. बोलबच्चन बोलघेवड्या शत्रुघ्न सिन्हा यांच्या अधिकृत चरित्राचे 'एनिथिंग बट खामोश' हे शीर्षक त्यांच्या स्वभावाविषयी बरेच काही सांगून जाते.

आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांना फक्त तनहाई (१९७३) या चित्रपटासाठी बंगाल फिल्म जर्नलिस्ट संघटनेचा पुरस्कार मिळाला. मध्यप्रदेश शासनाचा राष्ट्रीय किशोरकुमार सन्मान त्यांना वर्ष २००६-०७ करिता प्राप्त झाला. आयफा, स्टार डस्ट, फिल्म फेअर या चित्रपट नियतकालिकांनी त्यांना वेगवेगळ्या वर्षी जीवनगौरव पुरस्काराने गौरविले. नाव जरी शत्रुघ्न, तरी मित्र हा सकलांचा..!

(लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

देवेंद्र प्रभुणे

# मला इंडस्ट्रीतून बाहेर काढण्यासाठी काहीजणांचा प्रयत्न



'हिरो नंबर १', 'कुली नंबर १', 'पार्टनर', 'आँखियों से गोली मारे', अशा अनेक चित्रपटांतून गोविंदा यशाच्या शिखरावर पोहोचला. ९० च्या दशकात अभिनेता प्रसिद्धीच्या शिखरावर पोहोचला होता. मात्र, त्यानंतर त्याच्या करिअरला उतरती कळा लागल्याचे पाहायला मिळाले. गोविंदाने आता पुनरागमन करणार असल्याचे वक्तव्य केले आहे. आता मात्र अभिनेता त्याच्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आला आहे. गोविंदाने नुकतीच एक मुलाखत दिली. या मुलाखतीत गोविंदाने म्हटले, माझ्या करिअरमध्ये एक काळ असा होता, ज्यावेळी मला बदनामी सहन करावी लागली. काही लोक मला इंडस्ट्रीतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करत होते. मी अशिक्षित व्यक्ती या शिक्षित लोकांमध्ये आलो होतो आणि त्यांना मला बाहेर काढायचे होते, हे मला समजले होते. मी त्यांची नावे घेणार नाही, कारण इंडस्ट्रीमध्ये केलेल्या कामामुळे मी अजूनही टिकून आहे, असे म्हणत चित्रपटसृष्टीतून त्यांना बाहेर काढण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केल्याचा खुलासा गोविंदाने केला आहे. काळानुसार गोविंदाने त्याच्यामध्ये बदल केला नसल्याचेदेखील अनेक कलाकारांनी म्हटले आहे. गोविंदाची पत्नी सुनिता आहुजाने एका मुलाखतीत गोविंदा ९० च्या दशकात अडकल्याचे म्हटले होते. गोविंदाला अनेकदा ९० च्या दशकातून बाहेर पडण्यासाठी सांगितल्याचे देखील सुनिताने म्हटले होते. ९० चे दशक गाजवल्यानंतर काही मोजके चित्रपट सोडले तर गोविंदा कोणत्या चित्रपटात दिसला नव्हता. आता काही दिवसांपूर्वीच अभिनेत्याने कपिल शर्माच्या 'द ग्रेट इंडियन कपिल शो'मध्ये हजेरी लावली होती, त्यावेळी तो लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचे म्हटले होते. या वर्षी तीन चित्रपटांतून तो प्रेक्षकांचे मनोरंजन करणार असल्याचे वक्तव्य गोविंदाने केले होते. आता अभिनेता कोणत्या चित्रपटातून आणि कोणत्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी गोविंदा व त्याची पत्नी सुनिता आहुजा त्यांच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत होते. ते विभक्त होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते.



# कार्तिक रुचत असणाऱ्या अफेयरच्या चर्चांना वैतागली श्रीलीला

सलग तीन वर्षे SAIMMA (साउथ इंडियन इंटरनॅशनल मूव्ही अवॉर्ड्स) जिंकून दक्षिण चित्रपटसृष्टीत खळबळ उडवणारी अभिनेत्री श्रीलीला अभिनेता इब्राहिम अली खानसोबत 'सरजमीन' चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत पदार्पण करणार आहे, परंतु हा चित्रपट कधी प्रदर्शित होईल हे कोणालाही माहिती नाही.

दरम्यान, दिग्दर्शक अनुराग बसूने कार्तिक आर्यनसोबतच्या त्यांच्या पुढील शीर्षक नसलेल्या चित्रपटाची नायिका तिला बनवले आहे, ज्याच्या वृत्तीमुळे हिंदी चित्रपटसृष्टीतील इतर कोणतीही प्रसिद्ध अभिनेत्री तिच्यासोबत काम करण्यास तयार नाही. कार्तिकचे चाहते त्याच्या दोन सवयींवर विशेष लक्ष ठेवतात, एक म्हणजे त्याला कोणत्याही प्रकारचा पुरस्कार मिळत असला तरी. म्हणजे तो चंद्रावरही जाऊ शकतो. दुसरे म्हणजे, चित्रपट सुरू होताच त्याचे त्याच्या चित्रपटातील नायिकेशी प्रेमसंबंध असतात किंवा चित्रपटाच्या शेवटी त्यांचे ब्रेकअप होते. 'भूल भुलैया २' मध्ये तब्बूसोबतचे संबंध इतके बिघडले की दोघांनीही चित्रपटाच्या प्रदर्शनादरम्यान एकत्र स्टेजवर येण्यास नकार दिला.

'भूल भुलैया ३' दरम्यान त्याचे तृप्ती डिमरीशी भांडण झाले. असे म्हटले जाते की त्याला राजश्री प्रॉडक्शनचे दिग्दर्शक सूरज बडजात्या यांच्याशीही अडचण होती, जे त्याला त्याच्या पुढच्या चित्रपटात प्रियकर म्हणून घेऊ इच्छित होते. त्याचा शेवटचा त्रास त्याच्या शीर्षक नसलेल्या चित्रपटाच्या नायिकेशी आहे, श्रीलीला. अलीकडेच, एका कार्यक्रमात, कार्तिक आर्यनच्या पीआर टीमने श्रीलीलाच्या उपस्थितीत त्याच्या आईला डॉक्टर बहूबद्दल प्रश्न विचारला. वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या श्री लीलाला आता कळले आहे की ही संपूर्ण कथा आधीच रचली गेली होती आणि तिचे नाव कार्तिक आर्यनशी जोडण्यासाठी ती रचण्यात आली होती. तेव्हापासून श्रीलीलाचा राग खूप वाढला आहे असे म्हटले जाते. यामुळे अनुराग बसूच्या चित्रपटाचे पुढील वेळापत्रक सुरू होऊ शकले नाही.



# सर्वात उंच डोंगरावर शूट होतोय राजमौलींचा चित्रपट

चित्रपट निर्माते एसएस राजामौली यांचा आगामी बहुप्रतिक्षित चित्रपट 'एसएसएमबी २९' ने चाहत्यांमध्ये आधीच बरीच चर्चा निर्माण केली आहे. या चित्रपटात राजामौली सुपरस्टार महेश बाबूसोबत काम करत आहेत. दोघेही या चित्रपटाच्या निर्मितीमध्ये व्यस्त आहेत. आता एसएस राजामौली यांनी चित्रपटाच्या शूटिंग दरम्यान सेटवरील एक व्हिडिओ शेअर केला आहे. चित्रपटाची टीम काही दिवसांपासून ओडिशाच्या जंगलात शूटिंग करत होती. चित्रपट निर्मात्याने प्रियांका चोप्रा आणि महेश बाबू यांच्यासोबत ओडिशातील कोरापूट येथे चित्रीकरणाचे वेळापत्रक पूर्ण केले आहे आणि कोरापूटच्या लोकांचे त्यांच्या आदरातिथ्याबद्दल आभारही व्यक्त केले आहेत. हे वेळापत्रक ओडिशाच्या रमणीय कोरापूट जिल्ह्यात आयोजित करण्यात आले होते. दरम्यान, आता राजामौली यांनी या ट्रिपचा व्हिडिओ शेअर केला आहे. राजामौली यांनी ओडिशातील सर्वात उंच शिखर असलेल्या देवमालीच्या त्यांच्या सोलो ट्रेकचा व्हिडिओ शेअर केला. राजामौली यांनी लिहिले की वरून दिसणारे दृश्य खरोखरच मनमोहक होते. शिखरावर ट्रेकर्सनी टाकलेल्या कचऱ्याने डोंगर साचला होता, त्यामुळे झालेल्या दुःखद परिस्थितीबद्दल या अद्वितीय दिग्दर्शकाने दुःख व्यक्त केले. रस्ता कचऱ्याने भरलेला पाहून निराशा झाली, असे त्यांनी लिहिले. राजामौली यांनी "SSMB 29" चे ॲक्शन-पॅक्ड वेळापत्रक पूर्ण केले तेव्हा शेकडो चाहते स्टार दिग्दर्शकाला भेटले आणि स्थानिक स्वयंसेवा गटांनी बनवलेल्या खास भेटवस्तू देऊन त्यांचे स्वागत केले. एका चिठ्ठीत, राजामौली यांनी कोरापूटच्या लोकांचे आभार मानले आणि पुढील शूटिंगसाठी ते या प्रदेशात परत येतील असे आश्वासन दिले.

# बहुप्रतीक्षित 'वॉर २'ची प्रतिक्षा संपली

बॉलीवूड अभिनेता हृतिक रोशन 'वॉर २' चित्रपटातून पुन्हा एकदा कबीरच्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात हृतिकसोबत ज्युनियर एनटीआर खलनायकाच्या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. या बहुप्रतिक्षित क्शन चित्रपटात एक खास गाणे असणार आहे. ज्युनियर एनटीआर आणि हृतिक रोशन पहिल्यांदाच पडद्यावर एकत्र येत असल्याने चित्रपटाविषयीची उत्सुकता खूप वाढली आहे. 'वेक अप सिड', 'ये जवानी है दिवानी', 'ब्रह्मास्त्र' सारखे चित्रपट बनवणारा अयान मुखर्जी या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहे. तर आदित्य चोप्राच्या यशराज बॅनरखाली हा चित्रपट तयार होत आहे. 'वॉर' २०१९ साली रिलीज झाला होता. या चित्रपटात हृतिक रोशन आणि टायगर श्रॉफ एकमेकांना भिडताना दिसले होते. हा चित्रपट सुपरहिट ठरला होता. यानंतर आता या चित्रपटाच्या पुढील भागासाठी देखील चाहते कमालीचे उत्सुक आहेत. मात्र, अश्यातच या सिनेमाबद्दल एक मोठी अपडेट समोर आली आहे. नुकतंच होळीच्या निमित्ताने या सिनेमाचा एक अधिकृत व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करण्यात आला असून, यामध्ये सिनेमाची रिलीज डेट सांगण्यात आली आहे. हा चित्रपट ब्लॉकबस्टर धठऋ स्पाय युनिव्हर्सच्या वॉर फ्रँचायझीचा दुसरा भाग आहे. शेअर केलेल्या या व्हिडिओमुळे प्रेक्षकांमध्ये वॉर २ ची क्रेझ आणखी वाढली आहे. वॉर २ हा वायआरएफ स्पाय युनिव्हर्समधील पाचवा चित्रपट आहे. याआधी, एक था टायगर, टायगर जिंदा है, वॉर, पठाण आणि टायगर ३, या फ्रँचायझीचे सर्व चित्रपट ब्लॉकबस्टर हिट ठरले आहेत. हा व्हिडिओ शेअर करताना धठऋ ने लिहिले, 'अर्थात आम्ही थरीर चे मार्केटिंग सुरू करण्यापूर्वी तुम्ही ते उत्तम प्रकारे सेट केले आहे १४ ऑगस्ट २०२५ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये धुमाकूळ घालेल' असं यामध्ये सांगण्यात आलं आहे. दरम्यान, २०१९ साली १७० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवलेल्या वॉर चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अंदाजे ४७५ कोटी रुपये कमावले होते. हा चित्रपट सिद्धार्थ आनंद यांनी दिग्दर्शित होता. यामध्ये अभिनेत्री वाणी कपूर झळकली होती.



# मी योग्यवेळी घेतला ब्रेक

बॉलिवूड बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री आयशा जुल्का सध्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर सक्रीय आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये त्याच्या पेशासोबत आणखी काही गुण असतात. मला चित्रकाम अन् नक्षीकाम पसंत होते. परंतु चित्रपटांमध्ये व्यग्र असल्याने मी याकरता वेळ देऊ शकत नव्हते. परंतु आता वेळ मिळत असल्याने हे छंद पूर्ण करत असल्याचे आयशाने सांगितले आहे. माझी कारकीर्द बहरात असताना अनेक चित्रपट मी तारखा उपलब्ध नसल्याने करू शकले नाही. परंतु याचा मला पश्चाताप देखली नाही. मी त्या काळात योग्य निर्णय घेतले. त्यावेळी मला एकाच प्रकारच्या भूमिका मिळत होत्या. मनानुसार काम मिळत नसल्याने मी ब्रेक घेणे योग्य समजले असे आयशा यांनी म्हटले आहे. सद्यकाळात ओटीटी आणि मोठ्या पडद्यावर फारसे अंतर नाही. दोन्ही प्लॅटफॉर्मवर झोकून देत काम करावे लागते. हॅप्पी फॅमिली: कंडिशन्स अप्लाय या सीरिजच्या दुसऱ्या सीझनचे चित्रिकरण एप्रिल-मे महिन्यात सुरू होणार आहे. तर धनबाद नाव असलेल्या सीरिजचे चित्रिकरण पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. मी आता पसंत पडणारेच काम करत करायचे आहे. मला आता काही सिद्ध नाही. याचमुळे चांगला प्रोजेक्ट समोर आला तरच त्याची निवड करत असल्याचे आयशाचे सांगणे आहे.



# अक्षय कुमारच्या 'केसरी' चित्रपटाचा सिक्वेल येणार?



अभिनेता अक्षय कुमारचा 'केसरी' हा चित्रपट चांगलाच गाजला. या चित्रपटात अक्षय कुमारसोबत मख्य भूमिकेत परिणीती चोप्रा पाहायला मिळाली. या जोडीने प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन केले. या चित्रपटाच्या कथेसह यातील गाण्यांना देखील प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. अक्षय कुमारचा 'केसरी' चित्रपट २१ मार्च २०१९ मध्ये प्रदर्शित झाला होता आणि त्याला ६ वर्षे पूर्ण झाले आहे. या प्रसंगी, अभिनेत्याने एक विशेष पोस्ट शेअर केली आहे, त्यानंतर केसरी २ ची चर्चा सुरू झाली आहे. 'केसरी'च्या ६ वर्षानंतर चित्रपटाचा सीक्वल लवकरच भेटीला येणार असल्याची त्याने हिंट दिली आहे. अक्षय कुमारने पोस्टमध्ये 'केसरी'चा एक खास व्हिडीओ शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिलं की, केसरीच्या यशाची ६ वर्षे पूर्ण झाली आहेत. केसरी भावना आणि शौर्याची कहाणी आहे. लवकरच नवीन अध्यायाला सुरूवात करत आहोत. अक्षय कुमारच्या या पोस्टने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. तसेच 'केसरी'चा सीक्वल येणार असल्याची चर्चा सर्वत्र पाहायला मिळत आहे. अक्षयच्या या पोस्टवर चाहत्यांकडून कमेंट्सचा वर्षाव होत आहे. 'केसरी' या चित्रपटात २१ शीख सैनिकांच्या शौर्याची कहाणी सांगण्यात आली होती. यात अक्षय कुमारने ईशर सिंह यांची भूमिका साकारली आहे. यातील अक्षय कुमारच्या भूमिकेचेही कौतुक झाले. या चित्रपटाने कमाईच्या बाबतीतही चांगली कामगिरी केली होती.

बायोपिक व्यतिरिक्त जेपी दत्ताच्या बॉर्डर २ चित्रपटात काम करणार असल्याची चर्चा आहे. सध्या आयुष्मान खुरानाचे लक्ष त्याच्या संगीत कारकिर्दीवर आहे. त्याने वॉर्नर म्युझिक इंडियाशी हातमिळवणी केली आहे. नुकतेच त्याचे 'अंख दा तारा' हे गाणे रिलीज झाले असून, त्याला खूप पसंत केले जात आहे.

# सहा वर्षे चित्रपट न करता प्रियांका ठरली सर्वाधिक मानधन घेणारी अभिनेत्री



भारतीय चित्रपटसृष्टीत, कलाकारांच्या मानधनाचे गुपित हे एक अतिशय गुप्त आणि मोठे रहस्य मानले जाते परंतु कधीकधी काही अशा बातम्या बाहेर येतात आणि लपलेले सर्व रहस्य उघड होते. पुरुष सुपरस्टार आता प्रत्येक चित्रपटासाठी १०० कोटींपेक्षा जास्त मानधन घेत असले तरी, अभिनेत्री देखील हळूहळू त्यांना मागे टाकत आहेत. भारतातील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रीचा किताब अलीकडेच एका स्टारने तिच्या पुनरागमन चित्रपटासाठी तब्बल ३० कोटी मानधन घेतल्याने हातात आला. अभिनेत्री प्रियांका चोप्रा जवळजवळ सहा वर्षांनी एसएस राजामौली यांच्या पुढील चित्रपटातून भारतीय चित्रपटसृष्टीत परतत आहे. ज्यामध्ये महेश बाबू मुख्य भूमिकेत आहेत. या चित्रपटाद्वारे, प्रियांका २० वर्षांहून अधिक काळानंतर दक्षिण चित्रपटसृष्टीत पुनरागमन करत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रियांकाने या चित्रपटासाठी तब्बल ३० कोटी रुपये घेतले आहेत, जे एखाद्या भारतीय अभिनेत्रीने चित्रपटासाठी घेतलेले आतापर्यंतचे सर्वाधिक मानधन आहे. म्हणूनच त्यांनी तिला या प्रकल्पात सामील होण्याची घोषणा करण्यास इतका वेळ लावला. ती तिच्या फीसमध्ये तडजोड करण्यास तयार नव्हती आणि तिने का करावी? आपल्या चित्रपटांमध्ये फक्त नायकांनाच दुहेरी अंकी मानधन का मिळावे? असा देखील म्हंटल्याचं समोर आलं आहे.

मनोरंजक गोष्ट म्हणजे, प्रियांकाने यापूर्वी तिच्या अमेझॉन प्राइम व्हिडिओ शो सिटाडेलसाठी जास्त रक्कम- ५ दशलक्ष (४१ कोटींहून अधिक) आकारली होती. पण त्याचा कालावधी सहा तासांचा असल्याने, ही रक्कम अगदी योग्य होती. SSMB29 साठी तिची ३० कोटी फी कोणत्याही भारतीय चित्रपटासाठी महिला स्टारसाठी सर्वाधिक आहे. राजामौलीच्या जंगल ॲडव्हेंचरसाठी प्रियांकाला साइन करण्यापूर्वी, कल्की २८९८ एडी साठी तिच्या २० कोटी रुपयांच्या मानधनामुळे दीपिका पदुकोण सर्वाधिक मानधन घेणारी भारतीय अभिनेत्री होती. आलिया भट्ट प्रत्येक चित्रपटासाठी १५ कोटी रुपये घेते तर करीना कपूर, कतरिना कैफ, कियारा अडवाणी, नयनतारा आणि समांथा रूथ प्रभू सारख्या अभिनेत्री प्रत्येक प्रकल्पासाठी १० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक घेतात. या सर्वांना आता प्रियंकाने मागे टाकले असल्याचं दिसून येत आहे. सर्वांना 'शूबाईट' सिनेमाची उत्सुकता आहे.